MHAU070009222025

विशेष दिवाणी दावा क्र.१६/२०२५
**बाळु अशोक सोमासे Vs. रंजना व इतर**
नि.क्र.३३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांच्या विरुध्द झालेला 'उलटतपास नाही आदेश' बाजूस सारुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.

२ प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादीने असे कथन केले आहे की, त्यास दाव्याचे समन्स दि. १५.०६.२०२४ रोजी प्राप्त झाल्यानंतर ते दि. १५.०६.२०२४ रोजी वकीलामार्फत न्यायालयात हजर झाले. त्यानंतर ९० दिवसांचे आत त्यांनी लेखी म्हणणे अभिलेखावर दाखल करणे गरजेचे होते परंतु त्यांनी मुदतीत त्यांचे लेखी म्हणणे व जबाब अभिलेखावर दाखल न केल्याने त्यांच्या विरुध्द दि. १८.०८.२०२५ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आलेला आहे. उलटतपास आदेश बाजुस सारुन न घेतल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब सदर आदेश बाजूस सारुन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

<u>वादीचा लेखी जबाब</u>

३. वादीने नि.क्र. ३४ अन्वये सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. वादीचे असे कथन आहे की, मा. न्यायालयाने अनेकदा संधी देऊन देखील प्रतिवादींनी उलटतपास घेतला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये दहा हजार कॉस्टसह फेटाळण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

४. <u>दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.</u>

५. प्रस्तुत प्रकरणाच्या ई-अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दिनांक १५.०६.२०२४ रोजी प्रतिवादीला दाव्यातील समन्सची बजावणी झालेली आहे. ते दि. १५.०६.२०२४ रोजी वकीलामार्फत न्यायालयात हजर झाले आहे. दि. १८.०८.२०२५ रोजी प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाही असा आदेश परित करण्यात आला. प्रस्तुतचा अर्ज आज रोजी म्हणजेच दि. २०.०१.२०२६ रोजी दाखल केलेला आहे. याचाच अर्थ सदर अर्ज हा आदेश परित झालयापासुन सुमारे तीन महिन्याने दाखल केलेला आहे. अर्जात नमुद केलेल्या कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर नाही. सबब अर्जातील कारण योग्य आहे असे म्हणता येणार

नाही. मात्र दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागण्याकरीता प्रतिवादीचा लेखी जबाब पटलावर असणे आवश्यक आहे. विलंबाचे पृष्टयर्थ कोणतेही कादापत्रे पटलावर नसल्याने प्रतिवादीना योग्य ती कॉस्ट करणे उचित होईल.  सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. अर्ज रक्कम रुपये २०० कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी विरुध्द पारित करण्यात आलेला दि. १८.०८.२०२५ रोजीचा उलटतपास नाही आदेश बाजुस सारण्यात येतो.
३. सदर कॉस्ट प्रतिवादीने वादीला दयावी.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.01.21 16:17:52 -0100

दि. २०/०१/२०२६

(आर.एन. पाठक )
सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर),
गंगापुर

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba Age<br>Stenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 20/01/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 20/01/2026 |
| Judgment uploaded on | : 21/01/2026 |